# Possitive Stories

गडचिरोली दि. १३/०६/२०१७

# रक्तदान हेच श्रेष्ठदान

- ***जिल्हा पोलीस व सामान्य रुग्णालय गडचिरोली यांचा स्तुत्य उपक्रम***

आज दिनांक १३/०६/२०१७ रोजी गडचिरोली जिल्हा पोलीस व सामान्य रुग्णालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस रुग्णालय गडचिरोली येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. सदर शिबीरामध्ये एकूण ७६ पोलीस अधिकारी व जवानांनी रक्तदान केले. शिबीरामध्ये जिल्हा पोलीस, सीआरपीएफ, एसआरपीएफ तसेच पोलीस संकूल येथे राहणाऱ्या पोलीस जवानांच्या कुटूंबियांनी रक्दान केले. जिल्हयाचे पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान केले. सदर शिबीरास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलीस रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश पडोळे, डॉ. विलास कुमरे, सामान्य जिल्हा रुग्णालयाचे डॉ. अरविंद आलाम, रक्तपेढी अधिकारी डॉ. घोडमारे व चमू उपस्थित होते.


